LD

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**रामाआ - तक्रार क्र. अम- १०५९/२०१९**

तक्रारकर्ता श्री.**अॅड.गजेंद्र वारके,**
**रा.व्दारकाबाई, व्दारका नगर कांडली, परतवाडा, ता.अचलपुर, जि.अमरावती**
**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा **मा.जिल्हा व अप्पर न्यायालय कार्यालय,**
**अचलपुर, ता.अचलपुर, जि.अमरावती**

प्रथम अपिलीय अधिकारी, **मा.जिल्हा व अप्पर न्यायालय,**
**अचलपुर, ता.अचलपुर, जि.अमरावती**

**तक्रार सुनावणी दिनांक -** २५.०९.२०२३.

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | अनुपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | उपस्थित |

तक्रारकर्ता यांनी दि.१०.०५.२०१९ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये थेट तक्रार दाखल करुन, जिल्हा व अप्पर सत्र न्यायालय, अचलपूर येथे माहितीचा अधिकार कायद्याची अंमलबजावणी होत नाही. जिल्हा व अप्पर सत्र न्यायालय, अचलपूर, जिल्हा अमरावती येथे माहितीचा अधिकार कायद्यानूसार जन माहिहती अधिकारी, सहाय्यक जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती अद्यापही करण्यात आलेली नाही, असे कारण नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२५.०९.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.राजकुमार यावलकर व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.गजानन कानडे हे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे, तक्रारकर्ता यांचा युक्तीवाद व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता श्री.गजेंद्र वाळके यांनी दि.१०.०५.२०१९ रोजी अचलपूर जिल्हा सत्र न्यायालय येथे माहितीचा अधिकार कायद्याची अंमलबजावणी झाली नसल्याबाबत तसेच कलम ४ अन्वये एकूण १७ मुद्यांची माहिती प्रदर्शीत करणे बंधनकारक असतांना माहिती उपलब्ध नसल्याची



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती सत्यमेव जयते

तक्रार नोंदविली असून संबंधीतांना यावर विचारणा केली असता यावर अज्ञभिज्ञता दर्शविली, असेही नमूद केले. संबंधीत दुर्गण आदिवाशी बहुल मेळघाट व ग्रामीण भागातील जनता यांना सदर्हु न्यायालयातील प्रशासकीय व्यवस्था पारदर्शकपणे माहिती व्हावी याकरिता योग्य तो निर्णय पारित करण्याचे तसेच अचलपूर येथील न्यायालयात जन माहिती अधिकारी, सहाय्यक जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची त्वरीत नियुक्ती करावी व माहितीच्या अधिकार कायद्याची योग्य ती अंमलबजावणी करावी, अशी विनंती केली असून अचलपूर येथे माहितीचा अर्ज स्विकारला जात नाही व कलम ४ अन्वये १७ मुद्याची माहिती दिली नाही, असे तक्रारकर्ता यांनी त्यांचे तक्रार अर्जात नमूद केले असून याची प्रतिलीपी सर्व संबंधीत प्राधिकरणाला दिल्याचे आढळून येते. प्रस्तुत प्रकरणात आज झालेल्या सुनावणी विद्यमान प्र. प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती हे हजर असून यांनी या आधिच कलम (४) (१)(ख) अन्वये १ ते १७ मुद्यांची माहिती जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलबध करुन दिली असून अमरावती जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन आस्थापनामध्ये कलम ४ ची अंमलबजावणी झाली किंवा कसे याबाबत प्रशासकीय पातळीवर पडताळणी करण्याचे आश्वासन देखील दिले असून त्याची तत्काळ बजावणी करण्यात येईल, असे आज सुनावणी दरम्यान नमूद केले. दरम्यान तक्रारदार श्री.वारके यांचे वरील तक्रार अर्ज प्रलंबित असतांनाचे काळात दुर्देवी निधन झाले असल्यामुळे प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात यावा, अशी विनंती केली. मुळात कलम ४ (१)(ख) ची अंमलबजावणी ही सर्वच प्राधिकरणामध्ये होणे अपेक्षित असून याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय यांनी **रिट पिटीशन (सिव्हील नंबर) ९९०/२०२१ किशनचंद जैन विरुध्द युनियन ऑफ इंडीया** या प्रकरणात **दि.१७.०८.२०२३** रोजी पारित केलेल्या आदेशात माहिती अधिकार अधिनियमाखाली जास्तीत जास्त माहिती कलम ४(१)(ख) 4(1)(B) अन्वये स्वयंप्रेरणेने उघड करणे यावर भर दिला असून सर्व मा.आयोगाने याबाबत सकारात्मक भुमीका घेत सर्व अधिकाऱ्यांना, सर्व प्राधिकरणांना अशा प्रकारची माहिती ही स्वयंप्रेरणेने उघड करण्याबाबत प्रोत्साहित करणे, असे दिशानिर्देश जारी करण्यात आले होते व याबाबत सुचीत देखील करण्यात आले होते. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय यांनी त्यांचे पारित आदेशात परिच्छेद क्र.१,२,३,२२,२३,२४,२५, व २६ यात खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

1.This Writ Petition under Article 32 of the Constitution of India filed by way of a public interest litigation seeking multiple reliefs, running into three pages, the gist of which is only for a direction to implement the mandate of Section 4 of the Right to Information Act, 2005. 1 As the prayer is only for implementing the various obligations enlisted under Section 4, it is necessary to reproduce the Section for ready reference

> "4. Obligations of public authorities- (I) Every public authority shall— (a) maintain all its records duly catalogued and indexed in a manner and the form which facilitates the right to information under this Act and ensure that all records that are appropriate to be computerised are, within a reasonable time



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती